# बेरकी

त्याला शेंड्या लावते ती दिवसरात
वचन देते एक मग नंतर
त्यालाच काढते खुळ्यात

मादक नजर तिची करते त्याचा घात
मग चतुर भाषा बोलून बदमाष
त्यालाच म्हणते 'हो शांत'

मोहक तिची वाणी ऐकून येतो तो रंगात
मग विरक्त शब्द जुने ऐकवते त्याचेच
अन टाकते त्याला पेचात

भासते अशी ती बेरकी अन वस्ताद
पण आहे खेळकर, मनाची निखळ
अन खरे तर त्याच्या प्रेमात

By: Abhay B. Joshi